# महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या दिनांक १७/११/२०१८ रोजी संपन्न झालेल्या कार्यकारी समितीच्या सभेचा कार्यवृतांत

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीची दिनांक १७ नोव्हेंबर, २०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा अध्यक्ष, कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ यांचे अध्यक्षतेखाली **"टकले सभागृह "**, वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर येथे संपन्न झाली. सभेत उपस्थित कार्यकारी समिती सदस्यांची यादी ***(परिशिष्ट-१)*** नुसार सोबत जोडली आहे.

अ.प्र.मु.व.सं. तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ तथा सदस्य-सचिव यांनी ***सातव्या सभेच्या*** सुरूवातीस अध्यक्षांचे स्वागत केले व उपस्थित सर्व सदस्यांचे व इतर अधिकाऱ्यांचे स्वागताअंती समस्त उपस्थिताचा परिचय करून दिला. तसेच अध्यक्षांचे परवानगीने विषयसूचीनुसार सभेच्या कामकाजास सुरूवात केली.

**विषय क्र.१:- दिनांक १४/०५/२०१८ रोजी "टकले सभागृह", वनभवन, नागपूर येथे संपन्न झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे**.

दिनांक १४/०५/२०१८ रोजी संपन्न झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत या कार्यालयाचे पत्र क्रमांकःव्यसं/मनिपविमं-सभा/प्र.क्र.१०/१९२/१८-१९ दिनांक १६ मे, २०१८ व शुद्धीपत्र क्र. व्यसं/ मनिपविमं-सभा/ प्र.क्र.१०/२०१/१८-१९ दिनांक १८ मे, २०१८ अन्वये सर्व सभासदांना पाठविण्यात आलेला आहे. सदर कार्यवृत्तांतावर कोणत्याही सदस्यांकडून कोणत्याही विषयावर आक्षेप किंवा सुधारणा करणेबाबत सूचना प्राप्त झालेल्या नाहीत. तसेच सदस्य-सचिव यांचे सुचनेनुसार मागील सभेच्या कार्यवृत्तांताची श्री. एस. व्ही. माडभूषी, वि.व.अ.,मनिपविमं यांनी समितीस माहिती दिली व ते कायम करण्याबाबत विनंती केली. उपस्थित समिती सदस्यांच्या संमतीने **अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने सदर कार्यवृत्तांत कायम करण्यात आले**.

**विषय क्र.२.००:- महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यालयाचे वित्तीय वर्ष-२०१६-१७ च्या लेखा परिक्षणाला मंजुरी देणेबाबत व २०१७-१८ चे लेखा परिक्षण करण्याबाबत. [लेखा परिक्षण अहवाल (वर्ष २०१६-१७) सोबत जोडला आहे– *परिशिष्ट – २*]**

सदस्य-सचिव यांचे सुचनेनुसार श्री. एस. व्ही. माडभूषी, वि.व.अ.,मनिपविमं यांनी समितीस अवगत केले की, सन २०१६-१७ मध्ये या कार्यालयास रू.९२.४९ लक्ष अनुदान व बँकेचे व्याज

रू.१.४० लक्ष असा एकूण रू.९३.८९ लक्ष निधी प्राप्त झाला होता. त्याचे लेखा परिक्षण करण्यासाठी मे. अग्रवाल आणि गुप्ता चार्टर्ड अकाऊंटंट, नागपूर यांना आदेश देण्यात आले होते. त्यांनी त्यांचा लेखा परिक्षण अहवाल सादर केलेला होता *(प्रत सोबत जोडली आहे – परिशिष्ट-२)*. करिता सन २०१६-१७ चा लेखा परिक्षण अहवाल कार्यकारी समितीसमोर मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे. चर्चेअंती सदर **सन २०१६-१७ चा लेखा परिक्षण अहवाल कार्यकारी समितीद्वारा मंजुर करण्यात आला व त्यापुढील वर्षाचा म्हणजे सन २०१७-१८ चा लेखा परिक्षण माहे डिसेंबर, २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे अध्यक्ष महोदयांमार्फत निर्देश देण्यात आले**.

चर्चे दरम्यान प्रो. निशी के. मुखर्जी, समिती सदस्य यांनी समितीच्या निदर्शनास आणुन दिले की, लेख्यातील खर्चाच्या बाबींमध्ये निसर्ग पर्यटन प्रकल्पांच्या प्रचार, प्रसिद्धी व मार्केटींगवर काहीही खर्च झालेला दिसत नाही. तरी ह्या बाबीकरीता योग्य ती तरतूद करून निसर्ग पर्यटन प्रकल्पांच्या प्रचार, प्रसिद्धी व मार्केटींगवर भर देण्यात यावा.

ह्यावर अध्यक्ष महोदयांनी स्पष्ट केले की, प्रचार, प्रसिद्धी व मार्केटींग ही आपली गरज असली तरी, मंडळाचा मूळ उद्देश नफा कमविणे हा नसून, वनांबाबत जनसामान्यांमध्ये जागृती निर्माण करून वनांचे महत्व पटवून देणे तसेच ह्या माध्यमातून स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध करून देऊन त्यांचे जीवनमान उंचावणे हा आहे व त्यानंतर अ.प्र.मु.व.सं. तथा व्यवस्थापकीय संचालक, म.नि.प.वि.मं. ह्यांनी मंडळाचे प्रयत्न जास्तीत जास्त ठिकाणी पोहोचविण्यासाठी जरूरी असणारे मार्केटींग करीत आहोत, असे सांगितले.

**विषय क्र.३.००:- कॉफी टेबल बुक तयार करणेबाबत**.

सदस्य-सचिव यांचे सुचनेनुसार श्री. एस. व्ही. माडभूषी, वि.व.अ.,मनिपविमं यांनी सदर विषयाबाबत समितीस माहिती दिली की, मंडळाद्वारे विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रासाठीचे कॉफी टेबल बुक तयार केले असुन मराठवाडा व खानदेशकरिता कॉफी टेबल बुक तयार करावयाचे आहे. त्यानुसार मराठवाडा व खानदेशकरिता कॉफी टेबल बुक तयार करावयाचे कार्यवाहीस कार्यकारी समितीची मान्यता प्रदान करण्यासाठी सदर विषय सादर करण्यात आला आहे. सदर विषयाबाबत सदस्य-सचिवांनीही समितीस अवगत केले व त्यावर समितीद्वारा सविस्तर चर्चा झाली व **मराठवाडा व खानदेशकरिता कॉफी टेबल बुक तयार करावयाचे कार्यवाहीस समितीद्वारा मान्यता देण्यात आली. तसेच या अनुषंगाने पुढील प्रमाणे निर्देश देण्यात आले**.

- कॉफी टेबल बुकचे वितरण संबंधित लोकांना जास्तीत जास्त प्रमाणात करण्यात यावे. जसे की, एम.टी.डी.सी.चे पर्यटक संपर्क स्थळांचे ठिकाण (काऊंटर्स), खाजगी नामांकित हॉटेल्स् पर्यटनाशी संबधित संस्था / व्यक्ती, व्याघ्र प्रकल्प तसेच वन्यजीव पर्यटन स्थळे इत्यादी. **चर्चेअंती MTDC ला विदर्भ व पश्चिम महाराष्ट्राच्या कॉफी टेबल बुकच्या प्रति प्रचार व प्रसिद्धीकरीता देण्याचे ठरले**.

**विषय क्र.४.००:- निसर्ग पर्यटनांतर्गत झालेल्या कामाचे मुल्यांकन करण्याबाबत.**

सदस्य-सचिवांनी समितीसमोर विषद केले की, आतापर्यंत निसर्ग पर्यटनांतर्गत झालेल्या कामाचे मुल्यांकन करण्यास मुख्य वनसंरक्षक (मुल्यांकन), वन बल प्रमुख कार्यालय यांना या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-२/यो/२५० दि.०९/०८/२०१७ अन्वये विनंती करण्यात आलेली आहे. या अनुषंगाने क्र.कक्ष-२/ मुल्यांकन/७१० दि.१८/०१/२०१८ व क्र.कक्ष-२/ मुल्यांकन/२६ दि.०९/०७/२०१८ अन्वये स्मरणपत्र पाठविण्यात आले आहेत. त्यांनी पुढे विषद केले की, मंडळाने केलेल्या कामकाजाचे वन विभागाच्या मुल्यांकन शाखेद्वारे मुल्यांकन होणे गरजेचे आहे, त्यामुळे सदर विषय समितीसमोर सादर करण्यात आला आहे. **चर्चेअंती मंडळाने केलेल्या कामकाजाचे वन विभागाच्या मुल्यांकन शाखेद्वारे मुल्यांकन करून घेण्यास अध्यक्षांचे परवानगीने समितीची मंजुरी प्रदान करण्यात आली.**

**विषय क्र.५.००:- सन २०१८-१९ करिता गाईड व नॅचरालिस्ट प्रशिक्षण कार्यक्रम मंजुर करणेबाबत.**

सदस्य-सचिवांनी तसेच सदस्य-सचिव यांचे सुचनेनुसार श्री. एस. व्ही. माडभूषी, वि.व.अ., मनिपविमं यांनी समितीस पुढील प्रमाणे माहिती दिलीः-

**सन २०१८-१९ करिता मंडळाद्वारे खालील प्रमाणे प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे:-**

| अ.क्र. | पदनाम | प्रशिक्षणाचे ठिकाण | संख्या | प्रशिक्षणास जबाबदार अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १. | मार्गदर्शक (Guide) | पेंच व्याघ्र प्रकल्प | ४० | क्षेत्र संचालक, पेंच |
| | | मेळघाट व्याघ्र प्रकल्प | ४० | क्षेत्र संचालक, मेळघाट |
| | | नवेगांव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प | ४० | क्षेत्र संचालक, नवेगांव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प |
| | | चंद्रपूर | ४० | क्षेत्र संचालक, ताडोबा |
| २. | नॅचरालिस्ट | नागपूर | ४५ | क्षेत्र संचालक, पेंच |
| ३. | संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे सदस्य (माळी आणि रोपवाटिका) | चंद्रपूर | ४० | निदेशक, वन प्रबोधिनी, चंद्रपूर |
| ४. | विभागातील अधिकाऱ्यांकरिता प्रशिक्षण | चंद्रपूर | ३० | निदेशक, वन प्रबोधिनी, चंद्रपूर |
| ५. | माळी | नागपूर | ४० | मुख्य वनसंरक्षक, नागपूर वनवृत्त |

सदर प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यास कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. ह्याद्वारे स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध होईल व पर्यटकांसाठी त्यांची योग्य प्रकारे सेवा मिळेल.

**चर्चेअंती अध्यक्षांचे परवानगीने सदर प्रशिक्षण सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांकः टिआरएन-२०१४/४४०/प्र.क्र.६६/१४/१२-अ दिनांक ०१ नोव्हेंबर, २०१४ नुसार राबविण्यास समितीद्वारा मान्यता प्रदान करण्यात आली.**

**विषय क्र.६.००:- दिनांक २३ व २४ नोव्हेंबर, २०१८ रोजी कराड येथे आयोजित अखिल भारतीय पक्षीमित्र संमेलनाला शासनाकडुन आर्थिक पाठबळ मिळणेबाबत.**

सदस्य-सचिवांनी समितीस पुढील प्रमाणे माहिती दिली :-

"महाराष्ट्र पक्षीमित्र" संयोजित, कराड जिमखाना, कराड यांचेद्वारा दिनांक २३ व २४ नोव्हेंबर, २०१८ रोजी कराड येथे दुसरे अखिल भारतीय पक्षीमित्र संमेलन आयोजित करण्यात येत असुन महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाकडुन आर्थिक पाठबळ मिळणेबाबत विनंती केली आहे.

महाराष्ट्र राज्य पक्षीमित्र संघटना ही पक्षी, निसर्ग, पर्यावरण यांचे जतन व संवर्धन यावर गेली ३५ वर्षे सातत्त्याने काम करीत आहे. महाराष्ट्राच्या विविध भागात या विषयावर कार्यरत असलेल्या अनेक सामाजिक संस्थांच्या माध्यमातून संमेलने, निसर्ग प्रशिक्षण, निसर्ग प्रदर्शन, विविध स्पर्धा, तसेच निसर्ग शिबीरांच्या माध्यमातून जनजागृतीचे कार्य अखंडपणे करीत आहे.

करीता संयोजक संस्था, कराड जिमखाना, कराड या संस्थेस पक्षीमित्र संमेलनासाठी महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाद्वारे रू.१.०० लक्ष रक्कमेची आर्थिक मदत देण्याची समितीस शिफारस करण्यात आली.

समितीस हेही अवगत करून देण्यात आले की, जैवविविधता मंडळाने त्यांचे बोर्ड मिटींगमध्ये रू.१.०० लक्षची मंजूरी घेऊन या पक्षीमित्र संमेलनाला अनुदान उपलब्ध करून दिले आहे. ह्यास शासनाच्या मान्यतेची आवश्यकता नाही. तेव्हा अशा ह्या जागतिक दर्जाच्या सम्मेलनामार्फत निसर्ग पर्यटनाचे प्रसिद्धी व प्रचाराकरीता स्टॉल लावुन या संस्थेला रू.१.०० लक्ष मंजूर करण्यासाठी मान्यता प्रदान करण्यास हरकत नाही असे समिती सदस्यांनी सांगितले.

**चर्चेअंती संयोजक संस्था, कराड जिमखाना, कराड या संस्थेस पक्षीमित्र संमेलनासाठी निसर्ग पर्यटनाचे प्रसिद्धी व प्रचाराकरीता या संस्थेला रू.१.०० लक्षचा मडळाद्वारे निधीची मदत करण्यास अध्यक्षमहोदयांचे परवानगीने मंजुरी देण्यात आली.**

## **विषय क्र. ७.०० :- निसर्ग पर्यटन स्थळांच्या आराखड्यांना मंजुरी देण्याबाबत**.

अध्यक्ष महोदय यांनी असे नमूद केले की, मागील दिनांक १४/०५/२०१८ च्या सभेमध्ये सादरीकरणासाठीचा एक उत्तम नमुना (Standard Format) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ यांनी तयार करावा असे निर्देश देण्यात आले होते. तथापि, तो तयार करण्यात आला नाही, तरी तो तयार करण्यात यावा. ज्यात खालील बाबींचा समावेश असेलः-

पर्यटन स्थळ कोठे आहे, त्याचे साईट लोकेशन व नकाशा, जमीनीची मालकी, आराखड्याची बाबनिहाय अंदाजपत्रकीय रक्कम, आराखड्याचा कालावधी, अपेक्षित पर्यटकांची संख्या व त्यापासुन मिळणारा महसूल, स्थानिक लोकांना रोजगार निर्मिती, फॉरेस्ट कन्झरव्हेशन ॲक्टनुसार पडताळणी, प्रकल्प स्वावलंबी असणार की नाही, प्रकल्प निर्मितीनंतर त्याची देखभाल (Maintenance) कोण करणार (संयुक्त वनव्यवस्थापन समिती किंवा परिस्थितीकी विकास समिती), इत्यादी बाबींचा असावेश असेल. त्यावेळी अ.प्र.मु.व.सं. तथा व्यवस्थापकीय संचालक, म.नि.प.वि.मं. ह्यांनी हे स्पष्ट केले की, पुणे, जालना व नागपूर ह्या ३ चर्चासत्रात सर्व मुख्य वनसंरक्षक ह्यांना डहाणू वन विभागातील आशेरीगड किल्ल्याचा प्रकल्प आराखडा या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-६/ मनिविमं/ १६५/१८-१९ दिनांक ०९/०५/२०१८; क्र.कक्ष-६/ल.ले./ मनिपविमं/ २२१/१८-१९ दिनांक २१/०५/२०१८; क्र.कक्ष-६/ल.ले./मनिपविमं/ ५१४/१८-१९ दिनांक ३०/०७/२०१८ अन्वये सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रा.), तसेच वन्यजीव शाखेतील अधिकारी यांना पाठविण्यात आला आहे व त्याप्रमाणे प्रकल्प आराखडे बनविण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

**तसेच अध्यक्षांनी पुढील प्रमाणे सूचना दिल्या** :-

१. **प्रकल्प समितीच्या मंजुरीसाठी १ वर्ष कालावधीचा किंवा जास्तीत जास्त २ वर्ष कालावधीचा सादर करण्यात यावा**. जेणेकरून विविध स्त्रोतातून निधी उपलब्धतेची शाश्वती राहील. जास्त कालावधीचा असल्यास, निधी उपलब्धतेची शाश्वती राहणार नाही व प्रकल्पाचे काम अर्धवट राहुन प्रकल्प पूर्ण होईल याची शाश्वती देता येत नाही व निधी मिळविण्यास अडचण निर्माण होईल.
२. प्रकल्पासाठी सर्वप्रथम स्थानिक महानगरपालिका/नगरपालिका, जिल्हा नियोजन विकास समिती (DPDC), केंद्र पुरस्कृत योजना (CSS), तसेच उपलब्ध इतर स्त्रोतातून निधी उपलब्ध करण्याचे प्रयत्न व्हावे व नंतरच शासनाच्या राज्य योजनेतून किंवा आदिवासी विकास योजनेतून निधीची मागणी करावी.
३. नागरी बांधकामांसाठी सुद्धा इतर स्त्रोतातून निधी उपलब्ध करण्याचे प्रयत्न करण्यात यावे.

४. वेळोवेळी सूचना देऊनही मार्गदर्शक तत्वानुसार (Guidelines) प्रकल्प आराखडे तयार केले जात नाही. तरी दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार (Guidelines) नुसारच प्रकल्प तयार करण्यात यावा.
५. मुख्य वनसंरक्षक यांनी प्रकल्पाची तपासणी करून प्रकल्प भविष्यात स्वावलंबी राहील याची खात्री करूनच प्रकल्प अहवाल मंजुरीसाठी सादर करावा.
६. सर्व मुख्य वनसंरक्षक यांनी वरील सुचनांप्रमाणे प्रकल्प तयार करून **१० डिसेंबर, २०१८ पर्यंत** महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळास सादर करावे. त्यांच्याकडून तपासणी होऊन अभिप्रायासह प्रकल्प आराखडा ह्या मंडळाकडे येणे जरूरी आहे.
७. कार्यकारी समितीची पुढील सभा **माहे डिसेंबर, २०१८ मध्ये दिनांक २० ते २२ च्या दरम्यान आयोजित करण्यात येईल**.
८. मा. लोकप्रतिनिधींनी सूचविलेल्या प्रकल्पांपैकी जे प्रकल्प हाती घेता येणे शक्य नाही (वनक्षेत्र नसल्यामुळे इ.) त्यांचेबाबत अहवाल मुख्य वनसंरक्षक ह्यांनी महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळास कळविण्यात यावा व तसे संबंधित लोकप्रतिनिधींनाही कळविण्यात यावे.

## पुणे वन वृत्त :

**विषय क्र. ७.०१:- तळजाई टेकडी (पाचगांव पर्वती) विकास आराखडा – पुणे वन विभाग.**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| **७.०१** | सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण श्रीमती श्रीलक्ष्मी ए., उपवनसंरक्षक, पुणे यांनी केले.<br>त्यांनी तळजाई टेकडी (पाचगांव पर्वती) येथे ३० हे. क्षेत्रावर ईको-फ्रेण्डली प्रकल्प निर्मितीकरिता **एकूण रू.१३५६.५८ लक्षचा** विकास आराखडा सादर केला. त्यावर सविस्तर चर्चा होऊन पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात आला. | निधी उपलब्धतेचे मार्ग (Source) अनेक आहेत परंतु प्रकल्प निमिर्तीनंतर प्रकल्पाची देखभाल (Maintenance) करणे फार महत्वाचे आहे. Virtual Reality ची कामे वगळण्यात यावी.<br>**सदर प्रकल्पाकरिता पुणे महानगरपालिका (PMC) किंवा जिल्हा नियोजन विकास समिती (DPDC) कडुन निधी उपलब्ध करून घेण्याचे व खालील अटींचे अधिन राहुन मान्यता देण्यात येत आहे:-**<br>**१. सदर प्रकल्प वनक्षेत्रातच असावा.**<br>**२. प्रकल्पाची एकूण किंमत रू.५.०० कोटी पेक्षा जास्त नसावी. तसा प्रस्ताव तयार करून सादर करावा.**<br>**३. प्रकल्प आराखड्यातील स्थापत्य कामे (Civil Works) एकूण प्रकल्प अराखड्याच्या रक्कमेच्या ४०% पेक्षा जास्त नसावीत.** |

**विषय क्र.७.०२ :- ताम्हीणी पर्यटन स्थळाचा विकास – ताम्हीणी वनपरिक्षेत्र, पुणे वन विभाग.**

| **अ.क्र.** | **प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा** | **समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय** |
|---|---|---|
| **७.०२** | सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण श्रीमती श्रीलक्ष्मी ए., उपवनसंरक्षक, पुणे यांनी केले.<br>सादरीकरणाद्वारे स्पष्ट केले की, ताम्हीणी अभयारण्य वन्यजीव विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आले नसुन उपवनसंरक्षक पुणे यांचे प्रशासकीय अधिपत्याखाली आहे. त्याचे निसर्ग पर्यटन विकासाचा आराखडा **राज्य योजनेमध्ये रू.४००.०० लक्षचा सन २०१८-१९ ते २०२०-२१** या **३ वर्ष कालावधीचा** मंजुरीसाठी सादर केला आहे. प्रकल्प आराखड्याचा वर्षवार फेजनिहाय तपशिल देण्यात आला आहे. | **सदर प्रकल्पाचे सादरीकरण झाल्यानंतर चर्चेअंती खालील अटींचे अधिन राहुन मान्यता देण्यात येत आहे:-**<br>**१. सदर प्रकल्प वनक्षेत्रातच असावा.**<br>**२. प्रकल्पाची कामे ३ वर्षाचे आत पूर्ण करण्यात यावी.**<br>**३. प्रकल्प आराखड्यातील स्थापत्य कामे (Civil Works) एकूण प्रकल्प आराखड्याच्या रक्कमेच्या ४०% पेक्षा जास्त नसावीत.** |

**विषय क्र.७.०३:- मोजे-बावधन फॉ.स.नं. ३, ता. मुळशी, जिल्हा- पुणे येथील पर्यटन स्थळाचा विकास (नागरी व उद्यान) - वनपरिक्षेत्र पौड – वनविभाग, पुणे.**

| **अ.क्र.** | **प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा** | **समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय** |
|---|---|---|
| **७.०३** | सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण श्रीमती श्रीलक्ष्मी ए., उपवनसंरक्षक, पुणे यांनी केले.<br>सादरीकरणाद्वारे स्पष्ट केले की, पुणे वनविभागाअंतर्गत **राज्य योजनेमध्ये रू.१५७.०९ लक्षचा सन २०१८-१९ ते २०१९-२०** या **२ वर्ष कालावधीचा** मोजे-बावधन फॉ.स.नं. ३, येथील पर्यटन स्थळाचा विकास (नागरी व उद्यान) आराखडा मंजुरीसाठी सादर केला आहे. प्रकल्प | **सदर प्रकल्पाचे सादरीकरण झाल्यानंतर चर्चेअंती खालील अटींचे अधिन राहुन मान्यता देण्यात येत आहे:-**<br>**१. सदर प्रकल्प वनक्षेत्रातच असावा.**<br>**२. प्रकल्प आराखड्यातील स्थापत्य कामे (Civil Works) एकूण प्रकल्प आराखड्याच्या रक्कमेच्या ४०%** |

| | | |
|---|---|---|
| | आराखड्यात वर्षवार वर्षवार कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत. | **पेक्षा जास्त नसावीत.** |

**विषय क्र.७.०४:- तळेगांव वन उद्यान पर्यटन स्थळाचा विकास - वनपरिक्षेत्र वडगाव – वनविभाग, पुणे.**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| ७.०४ | सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण श्रीमती श्रीलक्ष्मी ए., उपवनसंरक्षक, पुणे यांनी केले.<br>सादरीकरणाद्वारे स्पष्ट केले की, पुणे वनविभागाअंतर्गत **राज्य योजनेमध्ये रू.५८.८३ लक्षचा सन २०१८-१९ चा १ वर्ष कालावधीचा** तळेगांव वन उद्यान पर्यटन स्थळाचा विकास आराखडा मंजुरीसाठी सादर केला आहे. | **सदर प्रकल्पाचे सादरीकरण झाल्यानंतर चर्चेअंती खालील अटींचे अधिन राहुन मान्यता देण्यात येत आहे:-**<br>१. **सदर प्रकल्प वनक्षेत्रातच असावा.**<br>२. **प्रकल्प आराखड्यातील स्थापत्य कामे** (Civil Works) **एकूण प्रकल्प आराखड्याच्या रक्कमेच्या ४०% पेक्षा जास्त नसावीत.** |

**विषय क्र.७.०५:- कडजाईमाता वन उद्यान पर्यटन स्थळाचा विकास – मौजे शिवापुर, ता. हवेली, जि.पुणे – वनपरिक्षेत्र पुणे – वनविभाग, पुणे.**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| ७.०५ | सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण श्रीमती श्रीलक्ष्मी ए., उपवनसंरक्षक, पुणे यांनी केले.<br>सादरीकरणाद्वारे स्पष्ट केले की, पुणे वनविभागाअंतर्गत **राज्य योजनेमध्ये रू.१०२.८० लक्षचा सन २०१८-१९ ते २०२०-२१** या **३ वर्ष कालावधीचा** कडजाईमाता वन उद्यान पर्यटन स्थळाचा विकास आराखडा मंजुरीसाठी सादर केला आहे. प्रकल्प आराखड्यात वर्षवार प्रस्तावित कामांचा तपशिल देण्यात आला आहे. | **सदर प्रकल्पाचे सादरीकरण झाल्यानंतर चर्चेअंती खालील अटींचे अधिन राहुन मान्यता देण्यात येत आहे:-**<br>१. **सदर प्रकल्प वनक्षेत्रातच असावा.**<br>२. **प्रकल्पाची कामे ३ वर्षाचे आत पूर्ण करण्यात यावी.**<br>३. **प्रकल्प आराखड्यातील स्थापत्य कामे** (Civil Works) **एकूण प्रकल्प आराखड्याच्या रक्कमेच्या ४०% पेक्षा जास्त नसावीत.** |

**विषय क्र.७.०६:-चक्रेश्वर मंदीर पर्यटन स्थळाचा विकास – चाकण वनपरिक्षेत्र – जुन्नर वन विभाग.**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| ७.०६ | सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण श्री.ए.पी. म्हसे, उपवनसंरक्षक, जुन्नर व वास्तुशास्त्रज्ञ श्री. अरूण सपकाळे यांनी केले.<br>सादरीकरणाद्वारे स्पष्ट केले की, जुन्नर वन विभागाअंतर्गत **राज्य योजनेमध्ये रू.२८९.३५ लक्षचा सन २०१८-१९ ते २०२०-२१** या **३ वर्ष कालावधीचा चक्रेश्वर मंदीर पर्यटन स्थळाचा विकास** आराखडा मंजुरीसाठी सादर केला आहे. प्रकल्प आराखड्यामध्ये वर्षवार फेजनिहाय तपशिल देण्यात आला आहे. | **सदर प्रकल्पाचे सादरीकरण झाल्यानंतर चर्चेअंती खालील अटींचे अधिन राहुन मान्यता देण्यात येत आहे:-**<br>**१. सदर प्रकल्प वनक्षेत्रातच असावा.**<br>**२. प्रकल्पाची कामे ३ वर्षाचे आत पूर्ण करण्यात यावी.**<br>**३. प्रकल्प आराखड्यातील स्थापत्य कामे** (Civil Works) **एकूण प्रकल्प आराखड्याच्या रक्कमेच्या ४०% पेक्षा जास्त नसावीत.** |

**विषय क्र.७.०७:- मौजे कडाची वाडी वनहद्दीतील रोटाईतळे स्थळाचा विकास आराखडा - जुन्नर वन विभाग.**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| ७.०७ | सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण श्री.ए.पी. म्हसे, उपवनसंरक्षक, जुन्नर व वास्तुशास्त्रज्ञ श्री. अरूण सपकाळे यांनी केले.<br>सादरीकरणाद्वारे स्पष्ट केले की, जुन्नर वनविभागाअंतर्गत **राज्य योजनेमध्ये रू.६८३.५३ लक्षचा सन २०१८-१९ ते २०२०-२१** या **३ वर्ष कालावधीचा** मौजे कडाची वाडी वनहद्दीतील रोटाईतळे स्थळाचा विकास आराखडा मंजुरीसाठी सादर केला आहे. प्रकल्प आराखड्यात प्रस्तावित वर्षवार फेजनिहाय कामांचा तपशिल देण्यात आला आहे. | **सदर प्रकल्पाचे सादरीकरण झाल्यानंतर चर्चेअंती खालील अटींचे अधिन राहुन मान्यता देण्यात येत आहे:-**<br>**१. सदर प्रकल्प वनक्षेत्रातच असावा.**<br>**२. प्रकल्पाची कामे ३ वर्षाचे आत पूर्ण करण्यात यावी.**<br>**३. प्रकल्पाची एकूण किंमत रू.५.०० कोटी पेक्षा जास्त नसावी.**<br>**४. प्रकल्प आराखड्यातील स्थापत्य कामे** (Civil Works) **एकूण प्रकल्प आराखड्याच्या रक्कमेच्या ४०% पेक्षा जास्त नसावीत.** |

**विषय क्र.७.०८:- शिंगेश्वर देवस्थान पर्यटन स्थळाचा विकास – राजगुरूनगर वनपरिक्षेत्र – घोड प्रकल्प विभाग, जुन्नर.**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| ७.०८ | सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण वास्तुशास्त्रज्ञ श्री. अरूण सपकाळे यांनी केले.<br>सादरीकरणाद्वारे स्पष्ट केले की, घोड प्रकल्प विभाग, जुन्नर अंतर्गत **राज्य योजनेमध्ये रू.२७८.६१ लक्षचा सन २०१८-१९ ते २०२०-२१** या **३ वर्ष कालावधीचा शिंगेश्वर देवस्थान पर्यटन स्थळाचा विकास** आराखडा मंजुरीसाठी सादर केला आहे. प्रकल्प आराखड्यामध्ये वर्षवार फेजनिहाय देण्यात आला आहे. | **सदर प्रकल्पाचे सादरीकरण झाल्यानंतर चर्चेअंती खालील अटींचे अधिन राहुन मान्यता देण्यात येत आहे:-**<br>**१. सदर प्रकल्प वनक्षेत्रातच असावा.**<br>**२. प्रकल्पाची कामे ३ वर्षाचे आत पूर्ण करण्यात यावी.**<br>**३. प्रकल्प आराखड्यातील स्थापत्य कामे (Civil Works) एकूण प्रकल्प आराखड्याच्या रक्कमेच्या ४०% पेक्षा जास्त नसावीत.** |

**विषय क्र.७.०९ :- मौजे राजापुर, ता. आंबेगांव येथील वनदेवबन पर्यटन स्थळाचा विकास आराखडा – घोडेगांव वनपरिक्षेत्र, जुन्नर वन विभाग.**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| ७.०९ | सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण वास्तुशास्त्रज्ञ श्री. अरूण सपकाळे यांनी केले.<br>सादरीकरणाद्वारे स्पष्ट केले की जुन्नर वन विभागाअंतर्गत **राज्य योजनेमध्ये रू.५३३.६४ लक्षचा सन २०१८-१९ ते २०२०-२१** या **३ वर्ष कालावधीचा** मौजे राजापुर, ता. आंबेगांव येथील वनदेवबन पर्यटन स्थळाचा विकास आराखडा मंजुरीसाठी सादर केला आहे. प्रकल्प आराखड्यामध्ये वर्षवार फेजनिहाय तपशिल देण्यात आलेला आहे. | **सदर प्रकल्पाचे सादरीकरण झाल्यानंतर चर्चेअंती खालील अटींचे अधिन राहुन मान्यता देण्यात येत आहे:-**<br>**१. सदर प्रकल्प वनक्षेत्रातच असावा.**<br>**२. प्रकल्पाची कामे ३ वर्षाचे आत पूर्ण करण्यात यावी.**<br>**३. प्रकल्पाची एकूण किंमत रू.५.०० कोटी पेक्षा जास्त नसावी.**<br>**४. प्रकल्प आराखड्यातील स्थापत्य कामे (Civil Works) एकूण प्रकल्प आराखड्याच्या रक्कमेच्या ४०% पेक्षा जास्त नसावीत.** |

**विषय क्र.७.१० :-      मौजे वळती, ता. आंबेगांव जि. पुणे येथील भार्गवराम परशुराम देवस्थान पर्यटन स्थळाचा विकास आराखडा – मंचर वनपरिक्षेत्र, जुन्नर वन विभाग.**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| ७.१० | सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण वास्तुशास्त्रज्ञ श्री. अरूण सपकाळे यांनी केले.<br>सादरीकरणाद्वारे स्पष्ट केले की, जुन्नर वन विभागाअंतर्गत **राज्य योजनेमध्ये रू.२८९.१६ लक्षचा सन २०१९-२० ते २०२१-२२ या ३ वर्ष कालावधीचा** मौजे वळती, ता. आंबेगांव जि. पुणे येथील भार्गवराम परशुराम देवस्थान पर्यटन स्थळाचा विकास आराखडा मंजुरीस्तव सादर केला आहे. प्रकल्प आराखड्यामध्ये वर्षवार फेजनिहाय तपशिल नमूद करण्यात आलेला आहे. क्षेत्र अतिक्रमीत आहे. | **सदर प्रकल्पाचे सादरीकरण झाल्यानंतर चर्चेअंती खालील अटींचे अधिन राहुन मान्यता देण्यात येत आहे:-**<br>**१. सदर प्रकल्प वनक्षेत्रातच असावा.**<br>**२. प्रकल्पाची कामे ३ वर्षाचे आत पूर्ण करण्यात यावी.**<br>३. |

**विषय क्र.७.११ :-      मौजे बोरी बु. पर्यटन विकास – जुन्नर वन विभाग.**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| ७.११ | सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण वास्तुशास्त्रज्ञ श्री. अरूण सपकाळे यांनी केले.<br>सादरीकरणाद्वारे स्पष्ट केले की, जुन्नर वन विभागाअंतर्गत **राज्य योजनेमध्ये रू.४७४.७३ लक्षचा सन २०१८-१९ ते २०२०-२१ या ३ वर्ष कालावधीचा** मौजे बोरी बु. पर्यटन स्थळाचा विकास आराखडा सादर केला आहे. प्रकल्प आराखड्यात प्रस्तावित कामांचा वर्षवार फेजनिहाय तपशिल देण्यात आला आहे. | **सदर प्रकल्पाचे सादरीकरण झाल्यानंतर चर्चेअंती खालील अटींचे अधिन राहुन मान्यता देण्यात येत आहे:-**<br>**१. सदर प्रकल्प वनक्षेत्रातच असावा.**<br>**२. प्रकल्पाची कामे ३ वर्षाचे आत पूर्ण करण्यात यावी.**<br>३. **प्रकल्प आराखड्यातील स्थापत्य कामे** (Civil Works) **एकूण प्रकल्प आराखड्याच्या रक्कमेच्या ४०% पेक्षा जास्त नसावीत.** |

## नाशिक वनवृत्त, नाशिक :

**विषय क्र.७.१२ :- मौजे मल्हारवाडी (बाळेश्वर), राहुरी वनपरिक्षेत्र, येथे पर्यटन विकासासाठी वन उद्यान तयार करणे - वनविभाग (प्रा.) अहमदनगर.**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| ७.१२ | सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण श्री. आदर्श रेड्डी, उपवनसंरक्षक, अहमदनगर यांनी केले.<br>सादरीकरणाद्वारे स्पष्ट केले की, मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नाशिक वनवृत्त, नाशिक यांचेमार्फत मौजे मल्हारवाडी (बाळेश्वर), राहुरी वनपरिक्षेत्र, फॉ.ग.नं.३२४ क्षेत्र ११२.९२ हेक्टर येथे पर्यटन विकासासाठी वन उद्यान तयार करणेबाबतचा **राज्य स्तरिय योजनेतंर्गत सन २०१८-१९ करिता १ वर्ष कालावधीचा रु.१७.२० लक्षचा** प्रकल्प आराखडा सादर केलेला आहे. प्रकल्प आराखड्यामध्ये प्रस्तावित कामांचा तपशिल देण्यात आलेला आहे. | **सदर प्रकल्पाचे सादरीकरण झाल्यानंतर चर्चेअंती खालील अटींचे अधिन राहुन मान्यता देण्यात येत आहे:-**<br>**१. सदर प्रकल्प वनक्षेत्रातच असावा.**<br>**२. प्रकल्प आराखड्यातील स्थापत्य कामे (Civil Works) एकूण प्रकल्प आराखड्याच्या रक्कमेच्या ४०% पेक्षा जास्त नसावीत.** |

चर्चेदरम्यान उपवनसंरक्षक, अहमदनगर यांची समितीस कळविले की, शिवटेकडी (चौडी) ता.मालेगांव / व कपीलनाथ आश्रम ढेकू खुर्द ता. नांदगाव हे दोन्ही प्रकल्प राबवावयाचे नाहीत. त्यावर अध्यक्ष महोदयांनी तसे मंडळाचे कार्यालयास व संबंधित लोकप्रतिनिधींना पत्राने कळविण्याचे निर्देश दिले.

**विषय क्र. ७.१३ :- ब्रम्हगिरी पर्यटन आराखडा, त्र्यंबकेश्वर, ता. त्र्यंबकेश्वर,जि. नाशिक – वन विभाग पश्चिम नाशिक**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| ७.१३ | सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण श्रीमती बेऊला एझिल मथ्थी, उपवनसंरक्षक, पश्चिम नाशिक यांनी केले.<br>त्यांनी विषद केले की, पश्चिम | **सदर प्रकल्पाचे सादरीकरण झाल्यानंतर चर्चेअंती जिल्हा नियोजन विकास समितीकडुन (DPDC) निधी प्राप्त करून घेण्याचे अधिन राहुन तसेच खालील अटींचे** |

| | | |
|---|---|---|
| | भाग, नाशिक विभागांतर्गत निसर्ग पर्यटन स्थळाचा विकास करणेकरीता **जिल्हास्तरीय योजनेतंर्गत सन २०१८-१९ ते २०२२-२३ एकूण ५ वर्ष कालावधीचा रु.१४३७.२६ लक्षचा** आराखडा सादर करण्यात आला असुन त्यास कार्यकारी समितीची मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे.<br>सदर प्रकल्प आराखड्यामध्ये प्रस्तावित कामांचा वर्षवार तपशिल देण्यात आलेला आहे. | **अधिन राहुन मान्यता देण्यात येत आहे:-**<br>१. **सदर प्रकल्प वनक्षेत्रातच असावा.**<br>२. **प्रकल्प आराखडा ३ वर्षापेक्षा जास्त कालावधीचा नसावा व प्रकल्पाची कामे ३ वर्षाचे आत पूर्ण करण्यात यावी.**<br>३. **प्रकल्पाची एकूण किंमत रू.५.०० कोटी पेक्षा जास्त नसावी. त्याप्रमाणे आराखडा तयार करून सादर करावा.**<br>४. **प्रकल्प आराखड्यातील स्थापत्य कामे** (Civil Works) **एकूण प्रकल्प आराखड्याच्या रक्कमेच्या ४०% पेक्षा जास्त नसावीत.** |

तसेच पुढे सूचना देण्यात आल्या की, प्रकल्प हा निसर्ग पर्यटनाला साजेसा असावा. काही बाबी अनावश्यक दिसून येतात. रोड / नागरी बांधकामे यासाठी DPDC कडुनच निधी घेण्याचा प्रयत्न करण्यात यावा व वानिकीशी संबंधित बाबींसाठी राज्य योजनेचा निधी वापरण्याचा प्रयत्न करावा.

चर्चेदरम्यान उपवनसंरक्षक, पश्चिम नाशिक यांनी समितीस कळविले की, श्री क्षेत्र वहीरवाडीचा प्रकल्प राबवावयाचा नाही. त्यावर अध्यक्ष महोदयांनी तसे मंडळाचे कार्यालयास व लोकप्रतिनिधींना पत्राने कळविण्याचे निर्देश दिले.

**विषय क्र. ७.१४ :- श्री. क्षेत्र खंद्रेश्वर मंदीर निसर्ग पर्यटन विकास आराखडा, खंदरमाळवाडी, ता. संगमनेर, उपवनविभाग - संगमनेर, वनवृत्त - नाशिक.**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| ७.१४ | सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण श्री.एम. आर. गायकर, उपविभागीय वन अधिकारी, संगमनेर यांनी केले.<br>त्यांनी विषद केले की, **सन २०१८-१९ ते २०२०-२१ करिता ३ वर्ष कालावधीचा रु.५६.९६ लक्षचा** श्री. | **सदर प्रकल्पाचे सादरीकरण झाल्यानंतर चर्चेअंती खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला –**<br>१. **NIC सेंटर वगळण्यात यावे, त्याचा येथे काही उपयोग नाही.**<br>**उर्वरित कामांचा आराखडा खालील अटींचे अधिन राहुन मान्यता देण्यात येत आहे:-**<br>१. **सदर प्रकल्प वनक्षेत्रातच असावा.** |

| | | |
|---|---|---|
| | क्षेत्र खंद्रेश्वर मंदीर निसर्ग पर्यटन विकास आराखडा मंजुरीसाठी सादर केलेला आहे. आदिवासी विभागाकडुन आता निधी मिळत नाही. तरी सदर प्रकल्पासाठी राज्य योजनेमधुन निधी उपलब्ध करून देण्यात यावा. | २. **प्रकल्पाची कामे ३ वर्षाचे आत पूर्ण करण्यात यावी**.<br>३. **प्रकल्प आराखड्यातील स्थापत्य कामे** (Civil Works) **एकूण प्रकल्प आराखड्याच्या रक्कमेच्या ४०% पेक्षा जास्त नसावीत**. |

**विषय क्र. ७.१५ :- पट्टाकिल्ला (विश्रामगड) निसर्ग पर्यटन विकास आराखडा मौजे तिरडे, ता. अकोले, उपवनविभाग - संगमनेर, वनवृत्त - नाशिक.**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| ७.१५ | सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण श्री.एम. आर. गायकर, उपविभागीय वन अधिकारी, संगमनेर यांनी केले.<br>त्यांनी विषद केले की, **सन २०१८-१९ ते २०२०-२१ करिता ३ वर्ष कालावधीचा रु.१९८.६३ लक्षचा** निसर्ग पर्यटन विकास आराखडा मंजुरीसाठी सादर केलेला आहे. प्रस्तावित कामांचा वर्षवार तपशिल आराखड्यामध्ये नमूद करण्यात आला आहे. | **सदर प्रकल्पाचे सादरीकरण झाल्यानंतर चर्चेअंती खालील अटींचे अधिन राहुन मान्यता देण्यात येत आहे:-**<br>१. **सदर प्रकल्प वनक्षेत्रातच असावा.**<br>२. **प्रकल्पाची कामे ३ वर्षाचे आत पूर्ण करण्यात यावी.**<br>३. **प्रकल्प आराखड्यातील स्थापत्य कामे** (Civil Works) **एकूण प्रकल्प आराखड्याच्या रक्कमेच्या ४०% पेक्षा जास्त नसावीत.** |

**विषय क्र. ७.१६ :- श्री. क्षेत्र बाळेश्वर जवळे निसर्ग पर्यटन विकास आराखडा, मौजे महालवाडी, ता. संगमनेर, उपवनविभाग - संगमनेर, वनवृत्त - नाशिक.**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| ७.१६ | सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण श्री.एम. आर. गायकर, उपविभागीय वन अधिकारी, संगमनेर यांनी केले.<br>त्यांनी विषद केले की, **सन २०१८-१९ ते २०२०-२१ करिता ३ वर्ष कालावधीचा रु.११७.३५ लक्षचा** श्री. क्षेत्र बाळेश्वर | **सदर प्रकल्पाचे सादरीकरण झाल्यानंतर चर्चेअंती खालील अटींचे अधिन राहुन मान्यता देण्यात येत आहे:-**<br>१. **सदर प्रकल्प वनक्षेत्रातच असावा.**<br>२. **प्रकल्पाची कामे ३ वर्षाचे आत पूर्ण करण्यात यावी.** |

| | | |
|---|---|---|
| | जवळे निसर्ग पर्यटन विकास आराखडा मंजुरीसाठी सादर केलेला आहे.<br>प्रस्तावित कामांचा वर्षवार तपशिल आराखड्यामध्ये नमूद करण्यात आला आहे. | **३. प्रकल्प आराखड्यातील स्थापत्य कामे** (Civil Works) **एकूण प्रकल्प आराखड्याच्या रक्कमेच्या ४०% पेक्षा जास्त नसावीत.** |

**विषय क्र. ७.१७ :- निसर्ग परिचय केंद्र चंदनापुरी येथील निसर्ग पर्यटन विकास आराखडा, ता. संगमनेर, उपवनविभाग - संगमनेर, वनवृत्त - नाशिक.**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| ७.१७ | सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण श्री.एम. आर. गायकर, उपविभागीय वन अधिकारी, संगमनेर यांनी केले.<br>त्यांनी विषद केले की, **सन २०१८-१९ ते २०२०-२१ करिता ३ वर्ष कालावधीचा रु.५३.५० लक्षचा** निसर्ग परिचय केंद्र चंदनापुरी येथील निसर्ग पर्यटन विकास आराखडा मंजुरीस्तव सादर केलेला आहे. प्रस्तावित कामांचा वर्षवार तपशिल आराखड्यामध्ये नमूद करण्यात आला आहे. | **सदर प्रकल्पाचे सादरीकरण झाल्यानंतर चर्चेअंती खालील अटींचे अधिन राहुन मान्यता देण्यात येत आहे:-**<br>**१. सदर प्रकल्प वनक्षेत्रातच असावा.**<br>**२. प्रकल्पाची कामे ३ वर्षाचे आत पूर्ण करण्यात यावी.**<br>**३. प्रकल्प आराखड्यातील स्थापत्य कामे** (Civil Works) **एकूण प्रकल्प आराखड्याच्या रक्कमेच्या ४०% पेक्षा जास्त नसावीत.** |

## अ.मु.व.सं. कांदळवन :

**विषय क्र.७.१८ :- Vertical Garden तंत्राचा समावेश करून ऑक्सिजन वाढविण्याऱ्या कुंडया बसविणे – कांदळवन संरक्षण, मुंबई.**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| ७.१८ | सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण श्री. मकरंद घोडके, सहा. वनसंरक्षक, | चर्चेअंती असे ठरविण्यात आले की, सदर प्रकल्पात निसर्ग पर्यटनाचा कुठेच संबंध दिसत नाही. त्यामुळे सदर प्रकल्पासाठी इतर स्त्रोतातून निधी उपलब्ध करून |

| | | |
|---|---|---|
| | कांदळवन संरक्षण, मुंबई यांनी केले. **प्रकल्प किंमत रू.२६२.७२ लक्ष.** | घेण्यात यावा.<br>**सदर क्षेत्र हे जास्तीत जास्त म्हाडा क्षेत्रात असल्यामुळे वनविभागाचे मालकीचे क्षेत्रातील कुंपणाकरीता वनविभागातील योजनांमधुन अनुदान मागणी करण्याचे व उर्वरित क्षेत्राकरीता सीएसआर किंवा अन्य स्त्रोतातून अनुदान मिळविण्याचे अटीवर तसेच खालील अटींचे अधिन राहुन मान्यता देण्यात येत आहे:-**<br>१. **सदर प्रकल्प वनक्षेत्रातच असावा.**<br>२. **प्रकल्प आराखड्यातील स्थापत्य कामे** (Civil Works) **एकूण प्रकल्प आराखड्याच्या रक्कमेच्या ४०% पेक्षा जास्त नसावीत.** |

**विषय क्र. ७.१९ :- गोराई व दहिसर येथील प्रस्तावित मॅन्ग्रोव्ह प्रकल्पाबाबत - विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक.**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| ७.१९-अ | **गोराई मॅन्ग्रोव्ह प्रकल्प :**<br>सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण श्री. एम.एम. पंडितराव, प्रकल्प समन्वयक, कांदळवन कक्ष, मुंबई यांनी केले.<br>सादरीकरणपद्वारे स्पष्ट केले की, गोराई येथील मॅन्ग्रोव्ह पार्कचा क्षेत्र ८ हे., सविस्तर **प्रकल्प आराखडा रक्कम रू.१६९९.९५ लक्षचा** तयार करण्यात आला आहे. सदर प्रकल्प आराखड्यास जिल्हा नियोजन समिती, मुंबई उपनगर दि.३०/०६/२०१८ रोजीच्या बैठकीत मान्यता मिळाली आहे. **सदर प्रकल्पासाठी आवश्यक निधी जिल्हा नियोजन समिती, मुंबई उपनगर यांचेकडुन प्राप्त होणार आहे.**<br>जिल्हा नियोजन विकास समिती (DPDC) कडुन रू.१५.०० कोटी मंजुर झाले परंतु सद्या घेतले नाही व ते प्रकल्प मंजुरीनंतर पुढच्या वर्षी घेणार आहोत. | **सादरीकरण बघुन समितीचे सर्व सदस्य फार प्रभावित झाले व खालील अटींचे अधिन राहुन मान्यता देण्यात येत आहे:-**<br>१. **सदर प्रकल्प वनक्षेत्रातच असावा.**<br>२. **प्रकल्प आराखडा ३ वर्षापेक्षा जास्त कालावधीचा नसावा व प्रकल्पाची कामे ३ वर्षाचे आत पूर्ण करण्यात यावी.** |

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| ७.१९-ब | **दहिसर मॅन्ग्रोव्ह प्रकल्प :**<br>सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण श्री. एम.एम. पंडितराव, प्रकल्प समन्वयक, कांदळवन कक्ष, मुंबई यांनी केले.<br>सादरीकरणपद्वारे स्पष्ट केले की, दहिसर येथील मॅन्ग्रोव्ह पार्कचा प्रकल्प आराखडा क्षेत्र १२ हे., **रक्कम रू.३१५४.७४ लक्षचा** तयार करण्यात आला आहे. **सदर प्रकल्पासाठी आवश्यक निधी मागणीचा प्रस्ताव राज्यस्तरिय योजनेअंतर्गत अलाहीदा सादर करण्यात येत आहे.** | **सादरीकरण बघुन समितीचे सर्व सदस्य फार प्रभावित झाले व सविस्तर चर्चेअंती व खालील अटींचे अधिन राहुन मान्यता देण्यात येत आहे:-**<br>**१. सदर प्रकल्प वनक्षेत्रातच असावा.**<br>**२. प्रकल्प आराखडा ३ वर्षापेक्षा जास्त कालावधीचा नसावा व प्रकल्पाची कामे ३ वर्षाचे आत पूर्ण करण्यात यावी.** |

**विषय क्र.७.२०:- माहुली निसर्ग पर्यटन सेंटर, माहुली, वन्यजीव परिक्षेत्र खर्डी, उपवनसंरक्षक, वन्यजीव ठाणे.**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| ७.२० | सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण श्री.एम.के. राव, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम, मुंबई यांनी केले.<br>सादरीकरणाद्वारे स्पष्ट केले की, वन्यजीव, ठाणे या विभागाअंतर्गतचा माहुली निसर्ग पर्यटन सेंटरचा **जिल्हा स्तरीय योजनेअंतर्गत सन २०१८-१९ ते २०२०-२१ या ३ वर्ष कालावधीचा** आराखडा मंजुरीसाठी सादर केला आहे. सदर आराखड्यातील तृट्यांची पुर्तता **करून रू.३६१.८४ लक्षचा सुधारित आराखडा सादर केला आहे.**<br>त्यानुसार प्रस्तावित कामांचा फेजनिहाय वर्षवार कामे प्रस्तावित आहेत. | **सादरीकरण व चर्चेअंती खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला –**<br>**१. पहिल्या व दुसऱ्या वर्षांमध्ये प्रस्तावित कामांसाठी जिल्हा नियोजन विकास समिती (DPDC) कडुन निधी उपलब्ध करून घेण्यात यावा व तिसऱ्या वर्षीच्या प्रस्तावित कामांसाठी शासनाकडे निधीची मागणी करावी.**<br>**तसेच खालील अटींचे अधिन राहुन मान्यता देण्यात येत आहे:-**<br>**१. सदर प्रकल्प वनक्षेत्रातच असावा.**<br>**२. प्रकल्पाची कामे ३ वर्षाचे आत पूर्ण करण्यात यावी.**<br>**३. प्रकल्प आराखड्यातील स्थापत्य कामे (Civil Works) एकूण प्रकल्प आराखड्याच्या रक्कमेच्या ४०% पेक्षा जास्त नसावीत.** |

**विषय क्र. ७.२१:- कर्नाळा पक्षी अभयारण्य - उपवनसंरक्षक, वन्यजीव ठाणे.**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| ७.२१ | सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण श्री.एम.के. राव, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम, मुंबई यांनी केले.<br>सादरीकरणाद्वारे स्पष्ट केले की, मूळ आराखडा रू.२२२.९५ लक्षसाठी दिनांक २६/१०/२०१५ चे सभेत मंजूर केला आहे. तथापि कर्नाळा पक्षी अभयारण्याचा ***सुधारित आराखडा*** **राज्य स्तरीय योजनेअंतर्गत सन २०१८-१९ ते २०२०-२१ या ३ वर्ष कालावधीचा रू.११६५.४८६ लक्षचा** आराखडा मंजुरीसाठी सादर केला आहे . | **प्रकल्पाचे सविस्तर सादरीकरण व चर्चेअंती खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला –**<br>**१. प्रकल्प आराखड्यामध्ये प्रस्तावित काही कामे जिल्हा योजनेअंतर्गत व काही कामे राज्य योजने अंतर्गत घेण्याचे प्रयत्न करण्यात यावेत.**<br>**तसेच खालील अटींचे अधिन राहुन मान्यता देण्यात येत आहे:-**<br>**१. सदर प्रकल्प वनक्षेत्रातच असावा.**<br>**२. प्रकल्पाची कामे ३ वर्षाचे आत पूर्ण करण्यात यावी.**<br>**३. प्रकल्पाची एकूण किंमत रू.५.०० कोटी पेक्षा जास्त नसावी.**<br>**४. प्रकल्प आराखड्यातील स्थापत्य कामे** (Civil Works) **एकूण प्रकल्प आराखड्याच्या रक्कमेच्या ४०% पेक्षा जास्त नसावीत.** |

**विषय क्र.७.२२:- भास्कराचार्य निसर्ग गणितालय पाटनादेवी, ता.चाळीसगांवजि. जळगाव निसर्ग पर्यटन (गणित नगरी) विकास आराखडा - औरंगाबाद वन्यजीव विभाग.**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| ७.२२ | सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण श्री. एम.के. राव, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम, मुंबई यांनी केले.<br>सादरीकरणाद्वारे स्पष्ट केले की, औरंगाबाद वन्यजीव विभागाअंतर्गतचा **भास्कराचार्य निसर्ग गणितालय पाटनादेवी विकास आराखडा सन २०१८-१९ ते २०१९-२० या २ वर्ष कालावधीचा रू.१४२४.९४४ लक्षचा** सादर केला आहे. सदर प्रकल्पामध्ये राज्य योजना व जिल्हा योजनेमधुन निधी प्राप्त करण्यात येणार आहे. त्याचा बाबनिहाय वर्षवार तपशिल आराखड्यामध्ये देण्यात आलेला आहे. | **सदर प्रकल्पाचे सादरीकरण झाल्यानंतर चर्चेअंती खालील अटींचे अधिन राहुन मान्यता देण्यात येत आहे:-**<br>**१. सदर प्रकल्प वनक्षेत्रातच असावा.**<br>**२. प्रकल्पाची एकूण किंमत रू.१०.०० कोटी पेक्षा जास्त नसावी.** |

## धुळे वनवृत्त, धुळे :

**विषय क्र. ७.२३ :- विधानसभा क्षेत्रात निसर्ग पर्यटन राबवुन निधी मिळणेबाबत – जळगांव वन विभाग.**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| ७.२३ | सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण श्री. दिगंबर पगार, उपवनसंरक्षक, जळगांव यांनी केले. | **सादरीकरण झाल्यानंतर चर्चेअंती असे निर्देश देण्यात आले की, हा आराखडा उपवनसंरक्षक ह्यांनी वनविभागाचा आहे हे लक्षात घेऊन काळजीपूर्वक स्थळनिहाय बनवावा. निसर्ग पर्यटनाच्या बाबींशी साजेसा असा प्रकल्प स्थळाचा सविस्तर आराखडा तयार करून मुख्य वनसंरक्षक यांचे शिफारसीसह डिसेंबर महिन्यात आयोजित करावयाच्या कार्यकारी समितीच्या सभेपूर्वी तपासणीसाठी मंडळाकडे सादर करण्यात यावा.** |

## चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर :

**विषय क्र. ७.२४ :- शेणगांव निसर्ग पर्यटन स्थळ विकास आराखडा – चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर.**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| ७.२४ | सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण श्री. अ.ल. सोनकुसरे, विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर यांनी केले.<br>त्यांनी स्पष्ट केले की, सदरचा प्रकल्प **जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत असून जिल्हा योजना निसर्ग पर्यटन विकास** (२४०६-४८८८) या योजनेत प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पाचा **एकूण रू.७२.०९ लक्षचा** प्रकल्प आराखडा मंजुरीस्तव सादर केला आहे. कामांचा तपशिल आराखड्यामध्ये नमद करण्यात आलेला आहे. | **सदर प्रकल्पाचे सादरीकरण झाल्यानंतर चर्चेअंती खालील अटींचे अधिन राहुन मान्यता देण्यात येत आहे:-**<br>**१. सदर प्रकल्प वनक्षेत्रातच असावा.**<br>**२. प्रकल्प आराखड्यातील स्थापत्य कामे (Civil Works) एकूण प्रकल्प आराखड्याच्या रक्कमेच्या ४०% पेक्षा जास्त नसावीत.** |

**विषय क्र. ७.२५ :- वरोरा वन उद्यान विकास आराखडा – चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर.**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| ७.२५ | सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण श्री. अशोक सोनकुसरे, विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर यांनी केले.<br>त्यांनी स्पष्ट केले की, वनपरिक्षेत्र वरोरा अंतर्गत वनक्षेत्राचे विकास कामांचे व्यवस्थापन करण्यात येत आहे. निरनिराळ्या झाडांची व पर्यावरणाबद्दलची माहिती विद्यार्थी व नागरिकांना मिळण्याचे दृष्टीने जनजागृतीकरीता माहितीफलक इत्यादी कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत. आराखड्यामध्ये प्रस्तावित कामांचा तपशिल देण्यात आलेला आहे.<br>**एकूण रू.१०३.०० लक्षचा** प्रकल्प आराखडा सादर केला आहे. | **सदर प्रकल्पाचे सादरीकरण झाल्यानंतर चर्चेअंती खालील अटींचे अधिन राहुन मान्यता देण्यात येत आहे:-**<br>१. **सदर प्रकल्प वनक्षेत्रातच असावा.**<br>२. **प्रकल्प आराखड्यातील स्थापत्य कामे** (Civil Works) **एकूण प्रकल्प आराखड्याच्या रक्कमेच्या ४०% पेक्षा जास्त नसावीत.** |

## अमरावती वनवृत्त :

**विषय क्र. ७.२६ :- जामगांव निसर्ग पर्यटन स्थळ – वनपरिक्षेत्र मोर्शी – अमरावती वन विभाग.**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| ७.२६ | सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण श्री. एच.एच. वाघमोडे, उपवनसंरक्षक, अमरावती यांनी केले.<br>त्यांनी स्पष्ट केले की, वनपरिक्षेत्र मोर्शी अंतर्गत जामगांव निसर्ग पर्यटन स्थळाचा **रू.२३५.०७ लक्षचा सन २०१८-१९ ते २०२३-२४ पर्यंत ६ वर्ष कालावधीचा** विकास आराखडा मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे. प्रकल्पास भेटी देण्याऱ्या पर्यटकांची संख्या उत्तम राहणार असुन त्याद्वारे योग्य प्रमाणात महसूल प्राप्त होणार आहे व स्थानिकांना रोजगार | **सदर प्रकल्पाचे सादरीकरण झाल्यानंतर चर्चेअंती २ वर्षाचा आराखडा तयार करून कामे पूर्ण करण्यो अटीवर तसेच खालील अटींचे अधिन राहुन मान्यता देण्यात येत आहे:-**<br>१. **सदर प्रकल्प वनक्षेत्रातच असावा.**<br>२. **प्रकल्प आराखडा ३ वर्षापेक्षा जास्त कालावधीचा नसावा व प्रकल्पाची कामे ३ वर्षाचे आत पूर्ण करण्यात यावी.** |

| | | |
|---|---|---|
| | उपलब्धी होणार आहे. या ठिकाणी उंच झाडे लावण्यात येणार आहेत. सदर प्रकल्पासाठी काही निधी खर्च झालेला आहे व उरलेला निधी मंजुर करयात यावा. | **३. प्रकल्प आराखड्यातील स्थापत्य कामे** (Civil Works) **एकूण प्रकल्प आराखड्याच्या रक्कमेच्या ४०% पेक्षा जास्त नसावीत.** |

**विषय क्र. ७.२७ :- उदखेड निसर्ग पर्यटन स्थळ – वनपरिक्षेत्र मोर्शी – अमरावती वन विभाग.**

| **अ.क्र.** | **प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा** | **समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय** |
|---|---|---|
| **७.२७** | सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण श्री. एच.एच. वाघमोडे, उपवनसंरक्षक, अमरावती यांनी केले.<br>त्यांनी स्पष्ट केले की, वनपरिक्षेत्र मोर्शी अंतर्गत उदखेड निसर्ग पर्यटन स्थळाचा **रू.१७९.९८ लक्षचा सन २०१८-१९ ते २०२३-२४ पर्यंत ६ वर्ष कालावधीचा** विकास आराखडा मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे. प्रकल्पास भेटी देण्याऱ्या पर्यटकांची संख्या भरपूर राहणार असुन त्याद्वारे योग्य प्रमाणात महसूल प्राप्त होणार आहे व स्थानिकांना रोजगार उपलब्धी होणार आहे. या ठिकाणी बांबु लागवड करण्यात येणार आहेत. सदर प्रकल्पासाठी **रू.१५.०० लाख शासनाकडुन प्राप्त निधी खर्च झालेला आहे** व उरलेला निधीस मंजुरी देण्यात यावी. | **सदर प्रकल्पाचे सादरीकरण झाल्यानंतर चर्चेअंती खालील अटींचे अधिन राहुन मान्यता देण्यात येत आहे:-**<br>**१. सदर प्रकल्प वनक्षेत्रातच असावा.**<br>**२. प्रकल्प आराखडा ३ वर्षापेक्षा जास्त कालावधीचा नसावा व प्रकल्पाची कामे ३ वर्षाचे आत पूर्ण करण्यात यावी.**<br>**३. प्रकल्प आराखड्यातील स्थापत्य कामे** (Civil Works) **एकूण प्रकल्प आराखड्याच्या रक्कमेच्या ४०% पेक्षा जास्त नसावीत.** |

**अंबोरी** निसर्ग पर्यटन स्थळाचा व **आमनेर** निसर्ग पर्यटन स्थळाचा प्रकल्प आराखडे थोड्या वेगळ्या प्रकारे तयार करावेत व काही बाबींची प्रकल्प किंमत कमी करता येईल याकडे भर देऊन पुढच्या सभेमध्ये मंजुरीसाठी सादर करावेत.

## मेळघाट व्याघ्र प्रकल्प :

**विषय क्र.७.२८:- सन २०१८-१९ करीता मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील निसर्ग पर्यटनाचे दृष्टीने अत्यावश्यक कार्यबाबीस मान्यता प्रदान करण्याबाबतचा अतिरिक्त आराखडा.**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| ७.२८-अ | **मेळघाट व्याघ्र प्रकल्प :-**<br>सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण श्री.जि. गुरूप्रसाद, उपवनसंरक्षक, अकोट यांनी केले.<br>सादरीकरणाद्वारे त्यांनी स्पष्ट केले की, सदर आराखडा कार्यकारी समितीद्वारा मंजुर आहे. तथापि, त्यामध्ये काही कामांच्या बाबींचा समावेश नव्हता. त्या कामांच्या बाबी घेणे आवश्यक असल्याने **रू.६११३.५० लक्षचा ५ वर्ष कालावधीचा सुधारित आराखडा सादर करण्यात आला आहे.** तसेच जिल्हा नियोजन विकास समितीकडुन ह्याकरिता जास्त निधी उपलब्ध होत नाही. | **सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण झाल्यानंतर सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला.**<br>१. प्रकल्पामध्ये स्टाफ क्वार्टर्सचा समावेश करण्यात यावा व जुने क्वार्टर्स दुरूस्त करण्याचा समावेश करावा.<br>२. प्रकल्पाच्या लॅण्ड स्केपींग कामासाठी समितीचे सदस्य श्री.दिलीप चिंचमलातपूरे यांची मदत घेण्यात यावी.<br>३. सन २०१८-१९ या वर्षात आता जास्त दिवस शिल्लक नसल्यामुळे २०१८-१९ मध्ये काही बाबी कमी करून त्या बाबी सन २०१९-२० मध्ये घेण्यात याव्यात.<br>**वरील अटींचे अधिन राहुन मान्यता देण्यात आली.** |

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| ७.२८-ब | **काटेपूर्णा अभयारण्य :-**<br>सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण श्री.एम. एन. खैरनार, विभागीय वन अधिकारी (वन्यजीव), अकोला यांनी केले.<br>सादरीकरणाद्वारे त्यांनी स्पष्ट | **सदर प्रकल्पाचे सादरीकरण झाल्यानंतर चर्चेअंती खालील अटींचे अधिन राहुन मान्यता देण्यात येत आहे:-**<br>**१. सदर प्रकल्प वनक्षेत्रातच असावा.**<br>**२. प्रकल्प आराखडा ३ वर्षापेक्षा जास्त कालावधीचा नसावा व प्रकल्पाची कामे ३** |

| | | |
|---|---|---|
| | केले की, सदर आराखडा कार्यकारी समितीद्वारा मंजुर आहे. तथापि, आवश्यक असल्याने त्यामध्ये काही कामांच्या बाबींमध्ये बदल करण्यात येऊन **रू.६१९.२५ लक्षचा ६ वर्ष कालावधीचा सुधारित आराखडा सादर करण्यात आला आहे.** | **वर्षाचे आत पूर्ण करण्यात यावी.**<br>३. **प्रकल्पाची एकूण किंमत रू.५.०० कोटी पेक्षा जास्त नसावी. त्याप्रमाणे आराखडा तयार करण्यात यावा.**<br>४. **प्रकल्प आराखड्यातील स्थापत्य कामे** (Civil Works) **एकूण प्रकल्प आराखड्याच्या रक्कमेच्या ४०% पेक्षा जास्त नसावीत.** |

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| ७.२८-क | **ज्ञानगंगा अभयारण्य :-**<br>सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण श्री.एम. एन. खैरनार, विभागीय वन अधिकारी (वन्यजीव), अकोला यांनी केले.<br>सादरीकरणाद्वारे त्यांनी स्पष्ट केले की, सदर आराखडा कार्यकारी समितीद्वारा मंजुर आहे. तथापि, त्यामध्ये काही कामांच्या बाबींचा समावेश नव्हता. त्या कामांच्या बाबी घेणे आवश्यक असल्याने **रू.५२०.५० लक्षचा ६ वर्ष कालावधीचा सुधारित आराखडा सादर करण्यात आला आहे.** | **सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण झाल्यानंतर सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेअंत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला.**<br>१. प्रकल्पाची कामे करण्याची आपली जेवढी क्षमता आहे तेवढेच काम हाती घेण्यात यावेत.<br>२. Potential नुसार वास्तववादी (Realistic) प्रकल्प असावयास पाहिजे.<br>३. ह्या स्थळी भेटी देणाऱ्या पर्यटकांची सख्या फारच अल्प आहे, त्यामुळे साधनसामुग्रीवर (Infrastructure) जास्त खर्च करणे योग्य नाही.<br>४. उपयोगाअभावी साधनसामुग्रीचा अपव्यय होतो, ती तशीच पडून राहते.<br>५. आवश्यक तेवढीच साधनसामुग्री (Infrastructure) विकसित करा व पुढे हळू-हळू वाढवा.<br>६. सन २०१८-१९ चा निधी कमी करून २०१९-२० मध्ये घेण्यात यावा.<br>७. **आराखड्यातील बी खरेदी, माटरगाव पलढग धरणातून पाणी पूरवठा, NIC, Adventure Sport ह्या बाबी वगळुन रू.२९०.५० लक्षच्या सुधारित प्रकल्पास खालील अटींचे अधिन राहुन मान्यता देण्यात आली.**<br>१. **सदर प्रकल्प वनक्षेत्रातच असावा.**<br>२. **प्रकल्प आराखडा ३ वर्षापेक्षा जास्त कालावधीचा नसावा व प्रकल्पाची कामे ३ वर्षाचे आत पूर्ण** |

| | | |
|---|---|---|
| | | **करण्यात यावी.**<br>३. **प्रकल्प आराखड्यातील स्थापत्य कामे** (Civil Works) **एकूण प्रकल्प आराखड्याच्या रक्कमेच्या ४०% पेक्षा जास्त नसावीत.** |

## गडचिरोली वनवृत्त, गडचिरोली :

**विषय क्र. ७.२९ :- "हनुमान टेकडी" ता. अहेरी,जिल्हा गडचिरोली, वनपरिक्षेत्र अहेरी, आल्लापल्ली वन विभाग.**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| **७.२९** | सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण श्री.चंद्रकांत तांबे, उपवनसंरक्षक, आल्लापल्ली यांनी केले.<br>सादरीकरणाद्वारे स्पष्ट केले की, आल्लापल्ली विभागांतर्गत निसर्ग पर्यटन स्थळाचा विकास करणेकरीता **सन २०१८-१९ ते २०२२-२३ एकूण ५ वर्ष कालावधीचा रु.९५७.४२ लक्षचा** आराखडा मंजुरीसाठी सादर केलेला आहे. सदर आराखड्यात आढळलेल्या तृट्यांची पुर्तता करण्यात आली आहे. तसेच पुढे विषद केले की, **या निसर्ग पर्यटन आराखड्याबाबत मा. राज्यमंत्री (वने) यांनी विशेष स्वारस्य दाखवून प्रकल्प मंजुरीबाबत वेळोवेळी पाठपूरावा करीत आहेत.** | सादरीकरण व चर्चेअंती खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला.<br>१. अपेक्षित महसूल व होणारा खर्च याचा योग्य ताळमेळ बसविण्यात यावा.<br>२. प्रकल्पाची स्वावलंबी राहुन योग्य देखभाल होईल याची दक्षता घेण्यात यावी.<br>३. Potential लक्षात घेवुन प्रकल्प Sustainable कसा होईल याचा विचार करण्यात यावा.<br>४. टेंट हाऊस वगळण्यात यावे.<br>५. पहिल्या सन २०१८-१९ चा खर्च कमी करून तो पुढील २०१९-२० मध्ये वाढविण्यात यावा.<br>६. देखभाल (Maintenance) बाबी कमी कराव्यात.<br>७. हेमलकसा ते हनुमान टेकडी दरम्यान फलक लावण्यात यावेत, जेणे करून हेमलकसा येथे भेटी देणारे पर्यटक हनुमान टेकडी पर्यटन स्थळाकडे वळतील.<br>**वरील अटींचे अधिन राहुन विस्तार-१ (Phase-१) साठी तत्वत: रू.५.०० कोटीचा आराखडा मंजुर करण्यात येत आहे. ह्यासाठी विस्तार-१ (Phase-1) मधील रू.५.०० कोटीचा सविस्तर प्रस्ताव बनविण्यात यावा.** |

## ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर :

**विषय क्र.७.३० :-   चपराळा अभयारण्य विकास आराखडा – वन्यजीव विभाग, आल्लापल्ली.**

| अ.क्र. | प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व झालेली चर्चा | समितीद्वारा घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| ७.३० | सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण श्री. एम.के. मोटघरे, उपविभागीय वन अधिकारी (वन्यजीव), आल्लापल्ली यांनी सादरीकरणाद्वारे स्पष्ट केले की, सदर आराखडा **रू.२३०.०० लक्षचा पुर्वी मंजुर आहे.** काही काम जिल्हा नियोजन विकास समिती (DPDC) च्या निधीमधुन करण्यात आले. तथापि, मा. आमदाराचे मागणीनुसार **रू.२७५.०० लक्षचा सुधारित आराखडा** मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे. | सदर प्रकल्प आराखड्याचे सादरीकरण व सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलाः-<br>प्रस्तावाची प्रत मंडळाचे कार्यालयास सादर करावी. मंडळाचे कार्यालयाद्वारे त्याची तपासणी करून पुढील सभेमध्ये ठेवण्यात येईल.<br>**सबब सुधारित प्रकल्प नामंजूर करण्यात येतो.** |

**अध्यक्ष महोदयांनी निर्देश दिले की, वेळेअभावी सादरीकरण न झालेले प्रकल्प आराखडे समितीच्या माहे डिसेंबर, २०१८ मध्ये दिनांक २० ते २२ च्या दरम्यान घेण्यात येणाऱ्या पुढील सभेमध्ये मंजुरीसाठी ठेवण्यात यावेत.**

सरतेशेवटी सदस्य-सचिव, कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ यांनी सभेस उपस्थित समस्त पदाधिकारी व अधिकारी यांचे आभार मानले व अध्यक्षांचे परवानगीने सभा समाप्त झाल्याचे घोषित केले.

**कार्यवृतांत प्र.मु.व.सं. (वबप्र) तथा**
**अध्यक्ष,का.स., मनिपविमं यांचेद्वारा मंजुर.**

सदस्य-सचिव, कार्यकारी समिती व
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ,
नागपूर

*परिशिष्ट - 1*

# दिनांक १७ नोव्हेंबर, २०१८ रोजी संपन्न झालेल्या महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीच्या ६ व्या सभेमध्ये उपस्थितांची यादी

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नांव | समितीमधील पद | पदनाम |
|---|---|---|---|
| १. | श्री. यु. के. अग्रवाल | अध्यक्ष | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर |
| २. | श्री. ए. के. मिश्रा | सदस्य | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर |
| ३. | श्री. नितीन कोकोडकर | सदस्य | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर |
| ४. | श्री. एम. के. राव | सदस्य | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम, मुंबई. |
| ५. | श्री. सुनील लिमये | सदस्य | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व, नागपूर यांचे कार्यालय. |
| ६. | श्री. विकास गुप्ता | सदस्य | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कॅम्पा), महाराष्ट्र राज्य, नागपूर |
| ७. | श्री. जे. पी. त्रिपाठी | सदस्य प्रतिनिधी | प्रादेशिक व्यवस्थापक, एफडीसीएमलि, ***तथा*** व्यवस्थापकीय संचालक, एफडीसीएमलि यांचे प्रतिनिधी. |
| ८. | श्री. प्रशांत सवाई | सदस्य प्रतिनिधी | प्रादेशिक व्यवस्थापक, मपविमं, नागपूर ***तथा*** व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ किंवा यांचे प्रतिनिधी. |
| ९. | श्री. संजय करकरे | सदस्य | सहाय्यक संचालक, बी.एन.एच.एस.बी.-१, वंदना अपार्टमेंट, रामदासपेठ, नागपूर |
| १०. | प्रो. निशी के. मुखर्जी | सदस्य | ४६, रामदासपेठ, लोकमत बिल्डींग जवळ, नागपूर – ४४० ०१० |
| ११. | श्री. दिलीप आर.चिंचमलातपुरे | सदस्य | नयनतारा-२८, अद्यापक लेआऊट, जोग हॉस्पिटॅलिटीचे जवळ, मंगलमुर्ती चौक, रिंग रोड, नागपूर-४४००३६. |
| १२. | श्री. अरूण तिखे | सदस्य | २९, रघटाटे लेआऊट, दाताळा रोड, रामनगर, चंद्रपूर - ०२ |
| १३. | श्री. सुनील लिमये | सदस्य-सचिव | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक ***तथा*** व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर |